R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ५५

दि.०७ फेब्रुवारी २०२६,वार: शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## लातूर जिल्ह्यात १ हजार ७४७ केंद्रांवर शनिवारी मतदान; प्रशासनाची तयारी पूर्ण

### मतदान पथके रवाना; ८ हजार ४१४ अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश

### जिल्हा परिषदेसाठी २४२, तर पंचायत समित्यांसाठी ४१९ उमेदवार निवडणूक रिंगणात

### मतदान यंत्रावर जिल्हा परिषदसाठी पांढऱ्या, पंचायत समितीसाठी गुलाबी मतपत्रिका



लातूर, : राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार लातूर जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या लातूर, औसा, रेणापूर, चाकूर, अहमदपूर, उदगीर, जळकोट, निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी या १० पंचायत समित्यांचा सार्वत्रिक निवडणुकीसाठी शनिवार, ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वा. दरम्यान मतदान होणार आहे. यासाठी प्रशासन सज्ज झाले असून सर्व मतदान पथके आज संबंधित तालुका स्तरावरून रवाना झाली. तसेच चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने आवश्यक सज्जता केली आहे. जिल्ह्यात एकूण ५९ जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी २४२ उमेदवार निवडणूक रिंगणात असून १० पंचायत समित्यांच्या ११८ गणांमध्ये ४१९ उमेदवार निवडणूक लढवीत आहेत. जिल्ह्यात एकूण १४ लाख ९१ हजार १४९ मतदार असून, यामध्ये ७ लाख ८२ हजार ५१४ पुरुष आणि ७ लाख ८ हजार ६२२ महिला व १३ इतर मतदारांचा समावेश आहे.

जिल्ह्यात एकूण १ हजार ७४७ मतदान केंद्रांवर मतदान होणार असून यासाठी १ हजार ७४७ मतदान पथके स्थापन करण्यात आली आहेत. यामध्ये एकूण ८ हजार ४१४ अधिकारी, कर्मचारी यांचा समावेश राहणार आहे. सर्व केंद्रांवर रॅम्प, व्हीलचेअर, पिण्याचे पाणी, शेड आणि स्वतंत्र स्वच्छतागृहांची सुविधा राहणार आहे. मतदान प्रक्रियेसाठी १ हजार ७४७ बॅलेट युनिट आणि १ हजार ७४७ कंट्रोल युनिट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मतदान यंत्रावर जिल्हा परिषद गटाकरिता पांढऱ्या रंगाची तर पंचायत समिती गणाकरिता गुलाबी रंगाची मतपत्रिका असणार आहे.

पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त-जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया शांततामय वातावरणात पार पडावी, या काळात कायदा व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशासनामार्फत चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यासाठी ८ पोलीस उपाधीक्षक, १८ पोलीस निरीक्षक, १२५ सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक, १ हजार ९४५ अंमलदार, ३ हजार ८० होमगार्ड, राज्य राखीव पोलीस दलाच्या २ कंपन्या आणि १ प्लॅटून, यासह बाहेर जिल्ह्यातून १ हजार ९४३ होमगार्ड, ५३ अधिकारी, ६३० अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

१२ पैकी कोणतेही एक ओळखपत्र ग्राह्य; मात्र मतदार यादीत नाव आवश्यक-जिल्हा परिषद, पंचायत समिती मतदानासाठी मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे. मतदार यादीत नाव असेल व निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या बारा ओळखपत्रांपैकी कोणतेही एक ओळखपत्र असेल तर मतदान करता येणार आहे. भारतीय पासपोर्ट, आधार ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना, पॅन कार्ड, केंद्र तथा राज्य शासन किंवा सार्वजनिक उपक्रम यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना दिलेले फोटोसहित ओळखपत्र, बँक किंवा पोस्ट ऑफिसचे फोटो असलेले पासबुक, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला फोटोसहित दिव्यांगत्वाचा दाखला, मनरेगा जॉब कार्ड, निवृत्त कर्मचाऱ्याचे अथवा त्यांच्या विधवा तथा अवलंबीत व्यक्ती यांची फोटो असलेली निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे, लोकसभा अथवा राज्यसभा सचिवालय तसेच विधानसभा अथवा विधानपरिषद सचिवालय यांनी आपल्या सदस्यांना दिलेले अधकृित ओळखपत्र, स्वातंत्र्य सैनिकांचे फोटो असलेले ओळखपत्र, केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा योजनेचे फोटोसहीत कार्ड या बारा ओळखपत्रांपैकी कोणतेही एक ओळखपत्र मतदानासाठी ग्राह्य धरण्यात येईल.

तालुकानिहाय मतदान केंद्र संख्या-लातूर-३००, औसा-२५०, रेणापूर-१३१, चाकूर-१५१, अहमदपूर-२००, उदगीर-२०४, जळकोट-८४, निलंगा-२६८, शिरूर अनंतपाळ- ७६ आणि देवणी-८३.

## इंग्लिश सेमी इंग्लिश माध्यमाच्या शाळेत जबरदस्तीने फिस वसुली

### लहेङ्गरीं फिस भरल्याशिवाय एसएससी च्या परीक्षेला बसू दील जाणार नाही असा इशारा पालक आणि विद्यार्थी वर्गात संताप




मुंबई /प्रशांत ल. ढोणे :- मुंबई आणि संपूर्ण महाराष्ट्रातील सेमी इंग्लिश,आणि इंग्लिश स्कूल प्रशासन आणि व्यवस्थापन हे मुलाची फिस भरली नाही म्हणून एस. एस. सी आणि इतर वर्गातील विद्यार्थी यांना परीक्षा देण्यापासून वंचीत ठेवत आहेत त्याचे परीक्षेचं हॉल तिकीट येवून देखिल फिस भरली नाही म्हणून विध्यार्थ्यांना दिलेलं नाही म्हणून त्याच्यावर योग्य कारवाई करून एकही विध्यार्थी परीक्षा व शिक्षणा पासून वंचित राहणार नाही याची शिक्षण विभागाने दाखल घेतली पाहिजे *कारण २००९ चां शिक्षण अध्यादेश प्रमाणे एकाही* *विद्यार्थ्यांना परीक्षेपासून किंवा शिक्षणा पासून वंचित ठेवत येणार नाही .शिक्षण हा मूलभूत अधिकार आहे म्हणून ते शासनाने सक्तीचं केलं आहे*

परंतु हे संस्थाचालक ते सरास नियमाची पायमल्ली करून विद्यार्थ्याची आणि पालकाची पिळवणूक करत आहेत अशी पालकांची मागणी जोर धरत आहे

मुंबई ठाणे जिल्हा आणि तमाम महाराष्ट्रातील इंग्लिश माध्यमाच्या शाळेत या शाळा प्रशासनाने शिक्षणाच्या नावाखाली शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फिस भरली नाही म्हणून त्यांना त्रास देणं चालू केलं आहे

फिसच्यां नावाखाली यांनी भली मोठी रक्कम वसुल करून पालकांना भिकारी बनवण्याचा व्यवसायच यांनी चालू केला आहे

याच्याविरुद्ध अनेक वेळा वरिष्ट पातळीवर तक्रारी करून देखील त्याच्यावर काहीही कारवाई होत नाही आणि त्याच्यासोबत शिक्षण क्षेत्रातील आणि इतर सबंधित अधिकारी आणि कर्मचारी या वसुली मध्ये सहभागी आहेत त्या मुळे त्यांना याचा काहीही फरक पडत नाहीअशी पालकांमध्ये चर्चा आहे

आणि म्हणून संबंधित अधिकारी पालकाच्या आणि इतर नागरिकाच्या तक्रारी ऐकायला तयार नाहीत

*आत्ता तर या शिक्षण संस्थेच्या प्रशासनाने आणि मॅनेजमेंटने विध्यार्त्याना आणि पालकांना उद्धट बोलणं चालू केलं आहे ,भिकारी

तुमची फिस भरण्याची औकात नाही, इकडे का ॲडमिशन घेतल आत्ता जो पर्यंत फिस भरत नाही तो पर्यंत मुलांना शाळेत पाटवू नका जर शाळेत मुलांना पाटवले तर बाहेर हाकलून दिले जाईल , एस, एस, सी, किव्हा इतर वर्गातील विद्यारथी यांना परीक्षेला बसू दिले जाणार नाही तुम्हाला कुठ जायचं तिथे जा काही फरक पडणार नाही असा दमच भरला आहे अस पालकच म्हणणं आहे

त्यामुळे विद्यारथ्यामध्ये आणि पालकांमध्ये भीतीच वातावरण तयार झाले आहे

म्हणजे या शिक्षण संस्थाच्या लोकांनी एकप्रकारे *फिस वसुली च्या नावाने खंडणी वसुलीचा धंधा जोरात सुरू केला आहे*

आणि आत्ता तर ऐन परीक्षेच्या वेळी त्यांनी जबरदस्तीने पैसे वसुली सुरू केली आहे त्यामुळे अनेक विद्यार्थी शाळेत जात नाहीत आणि परीक्षेपासून वंचित राहणार आहेत त्यामुळे विद्यार्थ्याची मानसिकता खराब होत आहे तरी

याच्याविरुद्ध ताबडतोब कारवाई करून अशा सर्व मुलाच्या भविष्याचा विचार करून शाळांना आदेश देण्यात यावेत अशी विनंती पालक वर्ग शासनाकड करत आहेत

जेणेकरून एकही विध्यार्थी शिक्षणापासून आणि परीक्षा देण्यापासून वंचीत राहणार नाही याची गांभीर्याने दखल घेऊन विद्यार्थ्यांना आणि पालकांना न्याय द्यावा ही विनंती पालक वर्ग शासनाकडे करत आहेत

त्यामुळे सरकारचा शिक्षण विभाग याकडे गांभीर्याने घेऊन विद्यार्थी आणि पालक यांना न्याय देतात का या शिक्षण संस्थाचालकांना पाठीशी घालतात याकडे सर्वाचे लक्ष लागलेलं आहे

*जर याकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही तर येत्या १०फेब्रुवारी २०२६* *रोजी याच्या विरूध्द गुरुनानक शाळेच्या* *समोर दादासाहेब गायकवाड चौक उल्हासनगर कॅम्प न. ४ येथे १) लोककल्याण* *ग्राहक संरक्षण संस्था,

जनसुराज्य शक्ती आणि वेग वेगळ्या अनेक सामाजिक संघटना यांच्यावतीने जाहीर उपोषण आंदोलन करण्यात येणार आहे*याची जबाबदारी शासनाची राहील




## खासदार चंद्रशेखर आजाद यांच्या आदेशानुसार भिम आर्मी च्या राज्य सचिव पदी अक्षय धावारे यांची निवड

लातूर / प्रतिनिधी :_- गेल्या पंधरा वर्षांपासून आंबेडकरी चळवळीत सक्रिय काम करणारा युवक अक्षय धावारे यांची महाराष्ट्र राज्य सचिव पदी निवड करण्यात आली आहे भिम आर्मी चे संस्थापक तथा आजाद समाज पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार चंद्रशेखर आजाद भिम आर्मी चे राष्ट्रीय अध्यक्ष विनयरतन सिंह यांच्या आदेशाने महाराष्ट्राचे प्रभारी अनिल धेनवाल महाराष्ट्र अध्यक्ष अशोक कांबळे यांनी ही निवड केली आहे शोषित पिडीत वंचित घटकांचा आवाज म्हणून ओळख असलेला समाजावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा देणारा समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी झटणाऱ्या अक्षय धावारे यांचा आक्रमक चेहरा म्हणून सर्वत्र ओळख आहे समाजासाठी



दिवस रात्र संघर्ष करताना अनेक संकटांचा सामना करावा लागतो वेगवेगळ्या पोलीस स्टेशनमध्ये वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत ३५३ सारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल असताना पिडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी सामाजिक कार्यासाठी सदैव पुढे असतो २०१६ पासून भिम आर्मी च्या माध्यमातून त्यांचे कार्य चालू आहे तिन वर्षे जिल्हा संयोजक चार वर्ष महाराष्ट्र संघटक आणि एक वर्ष मराठवाडा निरीक्षक म्हणून संघटनेची जबाबदारी पार पाडल्या नंतर आज महाराष्ट्र सचिव म्हणून निवड झाली आहे योग्य व्यक्तीची योग्य ठिकाणी निवड करून त्याचा सन्मान केला त्यामुळे समाजातून मित्र परिवारातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

## संपादकीय...

## माता रमाई अश्रूंनी लिहिलेला इतिहास, त्यागाने घडवलेले भविष्य

इतिहास नेहमी रणांगणावर उभ्या असलेल्या पुरुषांची नावे मोठ्या अक्षरात लिहितो. पण त्या इतिहासाच्या प्रत्येक ओळीमागे अश्रू न गाळता वेदना सहन करणाऱ्या, मौनात जगलेल्या स्त्रियांचे जीवन दडलेले असते. माता रमाई आंबेडकर यांचे आयुष्य हे असेच आहेजिथे शब्द कमी पडतात आणि भावना गहिवरून जातात.

दारिद्र्याची छाया, पण स्वप्नांची मशाल

रमाईंचे आयुष्य दारिद्र्याच्या अंधारात सुरू झाले. घरात अन्न नव्हते, अंगावर वस्त्र कमी होते, आजारपणाने देह थकला होता; पण त्यांच्या मनात बाबासाहेबांच्या शिक्षणाचे स्वप्न पेटले होते. त्यांनी कधीही आमचं काय? असा प्रश्न विचारला नाही.

स्वतःच्या पोटावर दगड ठेवून त्यांनी बाबासाहेबांच्या ज्ञानदीपाला वारा लागू दिला नाही. तो दीप पुढे संपूर्ण समाजाला प्रकाश देईल, याची त्यांना खात्री होती.

घर सांभाळताना इतिहास घडत होता

बाबासाहेब देशोदेशी शिक्षण घेत असताना, रमाई घरातच लढत होत्या. उपेक्षेविरुद्ध, गरिबीविरुद्ध आणि नियतीविरुद्ध. संसाराची जबाबदारी, लेकरांची काळजी आणि समाजाचा तिरस्कारहे सगळे त्यांनी शांतपणे पेलले.

घराच्या चार भिंतीत राहूनही त्यांनी इतिहास घडवण्याचे काम केले.

मातृत्वाची जखम कधीही भरली नाही

आई म्हणून रमाईंच्या आयुष्यातील सर्वात भीषण अध्याय म्हणजे लेकरांचा अकाली मृत्यू. ही वेदना माणसाला मोडून टाकते; पण रमाईंनी ती वेदना गिळली. बाबासाहेबांच्या चेहऱ्यावर दुःख न दिसावे म्हणून त्यांनी स्वतःचे अश्रू लपवले.

त्यांचे मौन म्हणजे कमजोरी नव्हे, तर अतुलनीय धैर्याचे प्रतीक होते.

क्रांतीला आधार देणारे मौन

बाबासाहेबांचा प्रत्येक संघर्ष, प्रत्येक भाषण, प्रत्येक आंदोलनत्यामागे रमाईंच्या त्यागाची सावली होती. त्यांनी कधी श्रेय मागितले नाही, कधी प्रकाशझोतात यायची इच्छा व्यक्त केली नाही.

त्यांच्या आयुष्याचे ध्येय एकच होतेबाबासाहेबांचे स्वप्न जिवंत ठेवणे.

शिक्षण नसले तरी शहाणपण अमर

रमाई शिकलेल्या नव्हत्या, पण त्यांचे शहाणपण अनुभवातून आलेले होते. शिक्षणाचे महत्त्व त्यांनी शब्दांत नव्हे, तर आयुष्यातून सिद्ध केले. त्यांनी दाखवून दिले की खरी बुद्धिमत्ता ही त्यागात आणि समजूतदारपणात असते.

विस्मरणाचा अन्याय

समाजाने रमाईंना फार उशिरा ओळखले. त्यांच्या नावाने स्मारके कमी आहेत, त्यांच्या जीवनावर चर्चा कमी होतात. पण बाबासाहेबांच्या प्रत्येक विजयात रमाईंचा वाटा होता.

त्यांना विसरणे म्हणजे सामाजिक न्यायाच्या इतिहासालाच अपूर्ण ठेवणे होय.

आजच्या पिढीसाठी रमाईंचा संदेश

आजचा काळ स्वार्थाचा, दिखाव्याचा आणि वेगाचा आहे. अशा काळात रमाईंचे जीवन आपल्याला विचारायला भाग पाडतेआपण कोणासाठी जगतो? समाजासाठी आपण किती सहन करायला तयार आहोत?

रमाई शिकवतात की मोठी क्रांती शांतपणे, घराघरांत घडते.

निष्कर्ष रमाई म्हणजे विचार

माता रमाई आंबेडकर म्हणजे केवळ बाबासाहेबांची पत्नी नव्हे. त्या संविधानाच्या निर्मितीतील न बोललेले पान, सामाजिक समतेच्या लढ्यातील मूक साक्षीदार आणि त्यागाचे जिवंत प्रतीक होत्या.

त्यांच्या जयंतीनिमित्त आपण फक्त श्रद्धांजली अर्पण करू नये; तर त्यांच्या जीवनमूल्यांना आचरणात आणावे.

कारण रमाई म्हणजे अश्रूंनी लिहिलेला इतिहास आणि त्यागाने घडवलेले भविष्य. अशा माता रमाई यांनी आई, बहीण, मुलगी आणि पत्नीचे महान कार्य पार पाडणाऱ्या त्याग माता रमाई यांची

७ फेब्रुवारी जयंतीनिमित्त दैनिक महावृत्त परिवाराच्या वतीने विनम्र अभिवादन...

## लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयात अटकावून ठेवलेल्या वाहनांचा होणार लिलाव

लातूर, : येथील प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे मोटार वाहन करजमीन महसूल आदी थकबाकीमुळे अटकावून ठेवलेल्या जंगम मालमत्तेची (वाहनांची) विक्री लिलाव प्रक्रियेद्वारे होणार आहे. हा लिलाव १२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १२ ते दुपारी ३ वाजेदरम्यान ऑनलाइन पद्धतीने पार पडेल.

लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून वाहन धारकांना थकबाकी भरण्याचीसंधी दिल्यानंतरही वाहने सोडविली न गेल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.अटकावून ठेवलेल्या वाहनांची यादी, लिलावाच्या अटी व शर्ती तसेच इतर तपशील https://www.eauction.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाने केले आहे.

# बाबासाहेब शून्यातून जग का निर्मू शकले नसते???...

विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दु:ख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दु:खाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दु:खाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दु:ख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात– रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दु:खाशय होता. ही प्रेरणादायी माहिती श्री. एन. कृष्णकुमार, से.नि.अध्यापक यांच्या शब्दांत... संपादक.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाईंनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल वाटून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या, मात्र ताट तसेच उघडे. न राहून माईंनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या– या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे, कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. डॉ.बाबासाहेब म्हणतात– अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा, हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं. विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात माता रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दु:ख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दु:खाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दु:खाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दु:ख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात– रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दु:खाशय होता.

माता रमाई भीमराव आंबेडकर या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत. डॉ.आंबेडकर अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. माता रमाई आंबेडकर यांचा जन्म दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकूजी धुत्रे-वलंगकर व आई रुक्मिणी यांच्यासह रमाई दाभोळजवळील वणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ– शंकर अशी चार भावंडे होती. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकूजी दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यं पोहचवत असत. त्यांना छातीचा त्रास होता. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाईच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकूजी यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाईंचा सिंहाचा वाटा आहे. रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावलीच होती. त्यांनी आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्यांप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही. मुंबईतील भायखळा मार्केटमधील मासळी बाजार येथे बुधवार दि.४ एप्रिल १९०६ रोजी त्यांचे भीमरावांसोबत लग्न झाले. त्यांच्या जीवनाच्या अनेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात माईंना नेसायला लुगडे नव्हते. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका! पण रमाईंच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच बदलून गेले आहे. माई संसारात रमल्या, परंतु भीमराव पुस्तकांत रमले.

डॉ.बाबासाहेब व माता रमाई राजगृहात राहत असताना बाबासाहेबांना अचानक विदेशात जावे लागत होते. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे या आपल्या मित्राकडे काही दिवसासाठी माईंना पाठविले. वराळे काका लहान मुलांचे वसतिगृह चालवित होते. त्यांच्या आवारात लहान मुले नेहमी खेळायला येत असत. दोन-चार दिवसांत माईंना त्या लहान मुलांचा लळा लागला. दोन दिवस झाले मुले आवारात दिसली नाहीत, म्हणून माईंनी काकांना विचारले. काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण त्यांच्यात असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. माईंच्या त्यागाविषयी डॉ.बाबासाहेब बहिष्कृत भारतमध्ये लिहितात– आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माझ्या विपन्नावस्थेत गवताचे भारे स्वत:च्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही, अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही. बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. सन १९४०मध्ये लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी माईंना अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात– हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शाविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांच्या जीवनात अत्यंत कठीण काळात रमाईने त्यांना खंबीरपणे साथ दिल्यामुळेच अस्पृश्यांचे कैवारी डॉ.बाबासाहेबांना आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे जीवन फुलविता आले. दि.२७ मे १९३५ रोजी जगन्माता रमाईंचे मुंबई येथे दुःखद निर्वाण झाले.

!! माता रमाई जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या अपूर्व त्यागाला विनम्र अभिवादन !!

**श्री. एन. कृष्णकुमार, से.नि. अध्यापक.**
**(भारतीय थोरपुरुषांचे जीवनचरित्र अभ्यासक)**
**गडचिरोली, भ्रमणध्वनी- ७७७५०४१०८६.**

# रमाई आंबेडकर : संघर्ष, त्याग आणि सामाजिक क्रांतीची शांत मशाल

इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे गाजतात, तर काही व्यक्तिमत्त्वे इतिहास घडवतात. काहींची नावे सुवर्णाक्षरांनी लिहिली जातात, तर काहींचे अस्तित्वच इतिहासाला दिशा देते. रमाई आंबेडकर या दुसऱ्या प्रवाहातील व्यक्तिमत्त्व होत्या. बाबासाहेब आंबेडकरांच्या तेजस्वी विचारांच्या मागे उभी असलेली ही शांत शक्ती, सामाजिक क्रांतीची न दिसणारी पण अत्यंत निर्णायक मशाल होती. रमाई म्हणजे केवळ बाबासाहेबांची पत्नी नव्हे; त्या म्हणजे दुःखाला धैर्यात रूपांतर करणारी स्त्री, अन्यायाला सहन न करता विचारात बदल घडवणारी माता आणि दलित-वंचित समाजाच्या मुक्तीसाठी स्वतःचे आयुष्य अर्पण करणारी संघर्षयोद्धा. आज रमाई आंबेडकर जयंती साजरी करताना प्रश्न उभा राहतो, आपण रमाईंना किती समजून घेतले आहे? त्यांच्या जीवनातील त्याग, वेदना आणि संघर्षाला किती न्याय दिला आहे?

रमाईंचे बालपण म्हणजे गरिबी, उपेक्षा आणि सामाजिक अन्याय यांचे जिवंत चित्र होते. जातीय व्यवस्थेच्या बेड्या, स्त्री म्हणून दुय्यम स्थान आणि आर्थिक अभाव, या तिहेरी संकटात रमाईंचे आयुष्य घडले. परंतु या परिस्थितीने त्यांना मोडले नाही; उलट त्यांच्या मनात संघर्षाची मशाल पेटवली. बाबासाहेबांशी विवाहानंतर रमाईंचे आयुष्य अधिक कठीण झाले. बाबासाहेबांचे जीवन म्हणजे सततचा अभ्यास, आंदोलन, प्रवास आणि सामाजिक संघर्ष. त्या संघर्षाच्या प्रत्येक टप्प्यावर रमाईंचा वाटा होता पण तो वाटा इतिहासाने फारसा नोंदवला नाही. रमाईंचा संघर्ष हा मंचावरचा नव्हता; तो घरातला होता. बाबासाहेबांच्या आंदोलनासाठी आवश्यक असलेली आर्थिक व्यवस्था सांभाळताना रमाईंनी स्वतःच्या गरजा बाजूला ठेवल्या. घरातील दागिने विकले, उपाशी राहिल्या, अपमान सहन केला; पण बाबासाहेबांच्या विचारांवर कधीही प्रश्नचिन्ह लावले नाही. त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे त्यांच्या मुलांचे अकाली निधन. मातृत्वाचा आनंद मिळण्याआधीच त्यांना संततीच्या मृत्यूचे दुःख सहन करावे लागले. एका आईसाठी यापेक्षा मोठे दुःख कोणते असू शकते? पण रमाईंनी बाबासाहेबांच्या कार्यात खंड पडू दिला नाही.



त्यांच्या अश्रूंमध्येही सामाजिक क्रांतीचे स्वप्न जिवंत होते.

रमाईंचे जीवन म्हणजे एका स्त्रीच्या वेदनांचा इतिहास नाही; तो सामाजिक अन्यायाविरुद्धचा मौन बंडखोरीचा इतिहास आहे. भारतीय समाजात स्त्रीला नेहमीच सहनशीलतेचे प्रतीक मानले गेले. पण रमाईंनी सहनशीलतेला संघर्षाची दिशा दिली. त्यांनी कधीही सार्वजनिक मंचावर भाषणे दिली नाहीत; पण त्यांच्या जीवनातील प्रत्येक निर्णय हा स्त्रीस्वातंत्र्याचा घोष होता. आज स्त्री सक्षमीकरणाच्या चर्चा मोठ्या प्रमाणावर होतात पण रमाईंचे जीवन सांगते की, स्त्री सक्षमीकरण म्हणजे केवळ अधिकारांची भाषा नाही; ते त्याग, आत्मसन्मान आणि संघर्ष यांचे मिश्रण आहे. रमाई म्हणजे भारतीय स्त्रीवादी चळवळीतील दुर्लक्षित अध्याय. त्यांचे योगदान नोंदवले गेले असते, तर भारतीय स्त्रीवादी विचारांना अधिक व्यापक सामाजिक अधिष्ठान मिळाले असते. दलित चळवळ म्हणजे केवळ राजकीय आंदोलन नाही; ती मानवी प्रतिष्ठेची लढाई आहे. बाबासाहेबांनी या लढाईला वैचारिक अधिष्ठान दिले; पण त्या विचारांना भावनिक आधार रमाईंनी दिला. बाबासाहेबांच्या आंदोलनामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर विरोध झाला. त्या विरोधाचा सामना करताना रमाईंना सामाजिक बहिष्कार, अपमान आणि उपेक्षा सहन करावी लागली. पण त्यांनी कधीही आपल्या भूमिकेत तडजोड केली नाही. दलित समाजातील महिलांसाठी रमाईंचे जीवन एक दीपस्तंभ ठरले. आज दलित चळवळीत महिलांचा वाढता सहभाग हा रमाईंच्या त्यागाचा परिणाम आहे, हे विसरता येणार नाही.

भारतीय इतिहास लेखनात स्त्रियांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहिले आहे. रमाईंचे जीवन हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. बाबासाहेबांवर अनेक ग्रंथ लिहिले गेले; पण रमाईंच्या योगदानावर फारसा प्रकाश टाकला गेला नाही. हा विस्मरण केवळ ऐतिहासिक नाही; तो सामाजिक मानसिकतेचा परिणाम आहे. समाजाने नेहमीच पुरुषांच्या नेतृत्वाला महत्त्व दिले; पण त्या नेतृत्वामागील स्त्रीच्या त्यागाकडे दुर्लक्ष केले. रमाईंच्या जीवनाचा अभ्यास म्हणजे भारतीय समाजाच्या या मानसिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे होय. आज भारतीय समाजात जातीय विषमता, आर्थिक असमानता आणि स्त्रीविरोधी मानसिकता अजूनही अस्तित्वात आहे. संविधानाने समानता दिली असली तरी सामाजिक वास्तव अजूनही असमानतेने भरलेले आहे. अशा परिस्थितीत रमाईंचे जीवन आपल्याला सांगते की, क्रांती ही केवळ घोषणांनी होत नाही; तर ती त्यागातून जन्मते. ते सांगते, संघर्ष हा केवळ रस्त्यावरचा नसतो; तो घरातही असतो. ते सांगते, स्त्री ही केवळ सहकारी नसते; ती परिवर्तनाची शक्ती असते. आजची तरुण पिढी आधुनिकतेकडे झुकत आहे, पण त्या आधुनिकतेला सामाजिक न्यायाची जोड देणे आवश्यक आहे. रमाईंचे जीवन हे शिकवते की सामाजिक परिवर्तन हे दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण संघर्षातून घडते. रमाई आंबेडकर म्हणजे केवळ बाबासाहेबांच्या जीवनातील एक अध्याय नव्हे; त्या भारतीय सामाजिक क्रांतीच्या इतिहासातील एक अपरिहार्य शक्ती होत्या. त्यांच्या त्यागाशिवाय बाबासाहेबांचे कार्य इतके व्यापक झाले असते का, हा प्रश्न आजही समाजाला विचार करायला भाग पाडतो. रमाईंचे जीवन म्हणजे एका स्त्रीचे दुःख नाही; ती भारतीय समाजाच्या परिवर्तनाची गाथा आहे.

आज रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त आपण केवळ हार अर्पण करून थांबू नये. तर आपण स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे, आपण बाबासाहेबांचे विचार जगतो आहोत का? आपण रमाईंच्या त्यागाचा सन्मान करतो आहोत का? आपण समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवत आहोत का? जर उत्तर 'नाही' असेल, तर रमाईंची जयंती केवळ औपचारिक ठरेल. म्हणून आज गरज आहे, जातिव्यवस्थेविरुद्ध निर्भीड लढ्याची, स्त्रीदास्याविरुद्ध विचारांची, आर्थिक अन्यायाविरुद्ध संघटित संघर्षाची आणि बाबासाहेबांच्या विचारांना सामाजिक व्यवहारात उतरवण्याची. रमाईंचा खरा सन्मान म्हणजे, दलित, वंचित आणि स्त्रियांच्या स्वाभिमानासाठी उभे राहणे. रमाईंची खरी जयंती म्हणजे, समानतेचा विचार प्रत्यक्ष जीवनात उतरवणे. रमाईंची खरी श्रद्धांजली म्हणजे, अन्यायाविरुद्ध मौन तोडणे. तर चला आज आपण संकल्प करू या रमाईंच्या त्यागाला शब्द नव्हे, कृती देऊ!; बाबासाहेबांचे विचार केवळ पुस्तकात नव्हे, समाजात उतरवू!; जात, लिंग आणि वर्गाच्या भिंती पाडून समतेचा भारत घडवू! कारण रमाई आंबेडकर म्हणजे केवळ इतिहास नाही तर ती, त्या वर्तमानाची जाणीव आणि भविष्यातील दिशा आहेत.

रमाई आंबेडकर यांचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग आणि सामाजिक न्यायाची अमर गाथा. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना आपण केवळ शब्दांनी श्रद्धांजली देऊ नये; तर त्यांच्या विचारांना कृतीत उतरवण्याची प्रतिज्ञा करावी. रमाईंच्या त्यागातून प्रेरणा घेऊन बाबासाहेबांच्या विचारांनी समाज घडवू या, हीच त्यांच्या स्मृतींना खरी आदरांजली! समानता, स्वाभिमान आणि मानवतेच्या मूल्यांसाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सर्वांना क्रांतिकारी शुभेच्छा!

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# विलासरावांच्या नावाने होत असलेल्या रस्त्याच्या कामात कोणी शेण खाल्ले

## एक रुपयाचे कमिशन घेतले असेल तर सिद्ध करा त्याच दिवशी रमेश कराडच्या आमदारकीचा राजीनामा






लातूर – लातूर शहरातील विलासराव देशमुख यांच्या नावाने होत असलेल्या रस्त्याच्या कामात कोणी कमिशन खाल्ले, शादीखाना, भुयारी गटार योजनेत कोणी शेण खाल्ले सगळी कुंडली बाहेर काढली तर पळता भुई थोडी होईल असे सांगून गुत्तेदारी करण्यासाठी आणि कमिशनसाठी भाजपचे आमदार झालेत या आरोपाचा समाचार घेताना कोणत्याही कामात एक रुपया खाल्ला असेल कमिशन घेतले असेल तर सिद्ध करा त्याच दिवशी मी माझ्या आमदारकीचा राजीनामा देईन असे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

भारतीय जनता पार्टीच्या खरोळा जिल्हा परिषद गटातील उमेदवार सौ. शिवकन्या महिंद्र गोडभरले, खरोळा पंस गणातील उमेदवार सौ. शितल प्रताप राऊतराव आणि कारेपूर पंस गणातील उमेदवार सौ. अंजली राजेश काळे यांच्या प्रचारार्थ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांची खरोळा येथे गुरुवारी सायंकाळी जाहीर सभा झाली या सभेला प्रचंड मोठा जनसामुदाय उपस्थित होता. या सभेस ज्येष्ठ नेते ओमप्रकाश गोडभरले, भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष ऋषीकेशदादा कराड, रेणापूर चे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगीरे, विश्वनाथआप्पा हेने, ॲड. मोहन सिरसाठ, श्रीनिवास आकनगीरे, देवीदास कूटवाड, वसंत करमुडे, हानमंत राऊतराव, पांडुरंग आदुडे, सुरेंद्र गोडभरले, महेंद्र गोडभरले, लक्ष्मण यादव, सधाकर काळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थित होती. आ. कराड यांचे खरोळा गावात आगमन होताच फटाक्याची आतिषबाजी करून ढोल ताशाच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले.

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक ग्रामीण भागाच्या विकासासाठी महत्त्वाची असून काँग्रेसवाले नेत्याच्या प्रतिष्ठेसाठी मत मागत आहेत तर आम्ही जनतेच्या न्याय हक्कासाठी, ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी आशीर्वाद मागतोय असे सांगून भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेली पंधरा वर्ष या भागाचे काँग्रेसच्या आमदारांनी नेतृत्व केले त्यांनी खरोळा गावासाठी आणि परीसरासाठी विकासाची कोणती कामे केली, कुठल्या योजनेला निधी दिला असा प्रश्न उपस्थित करून माझ्या एक वर्षाच्या आमदारकीच्या कार्यकाळाचा काँग्रेसवाले हिशोब मागत आहेत. माजी आमदारापेक्षा कितीतरी पटीने विकास कामे केली. खरोळा येथील दत्त मंदिर, पांढरी येथील देवस्थान यासह विविध विकास कामासाठी कोठ्यावधीचा निधी मिळून दिला अनेक गावात विविध विकास कामासाठी पाहिजे तेवढा निधी उपलब्ध केला अनेक विकासाची कामे केली विकास निधी काय असतो आणि विकास कामे काय असतात हे मी दाखवून दिले.

रेणा कारखाना उभारणीला ३० – ४० वर्षे झाले अनेक पारितोषिके मिळविले तरीही तीनशे कोटी रुपयांचे कारखान्यावर कर्ज कसे कारखाना कशामुळे नुकसानीत आला शेतकऱ्यांना कळू द्या असे सांगून ऊसाच्या प्रत्येक गाडीमागे तीन टन ऊसाची चोरी होत असल्याचे पुरावे आमच्याकडे आहे जर तुम्ही शेतकऱ्याचे खरे कैवारी असाल तर बाहेर वजन केलेल्या ऊसाच्या गाड्या कारखान्यात घ्याव्यात असे रेणाच्या चेअरमनला या सभेतून जाहीर आ. रमेशआप्पा कराड यांनी आवाहन केले.

पैशातून सत्ता आणि सत्तेतून पैसा मिळविण्याचे काँग्रेसवाल्याचे धोरण जनतेने ओळखले असून पैशाच्या चोरावर निवडणुका जिंकण्याची दिवस संपले आहेत गोरगरीब सर्वसामान्य जनतेने माझ्यासारख्या शेतकऱ्याच्या मुलाला आमदार केले हेच देशमुखांना सहन होत नाही असे सांगून आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, सगळी पदे देशमुखांनाच हवी आहेत आमदार देशमुख, कारखान्याचे सर्व चेअरमन देशमुखच, बँकेत देशमुख त्यांना दुसरा मोठा झालेला चालत नाही. नाकर्त्या माणसाची फौज निर्माण करणाऱ्या काँग्रेसला मतदारांनी धडा शिकवला पाहिजे.

खरोळा जिल्हा परिषद सर्कलच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रगतीसाठी कोणाच्याही कसल्याही भुलथापाला बळी न पडता येत्या सात फेब्रुवारी रोजी कमळ चिन्हासमोरील बटन दाबून भाजपाच्या तिन्ही उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करावे आणि आपली सेवा करण्याची संधी द्यावी असेही आव्हान आ. कराड यांनी केले.

गाववाला पाहिजे की कामवाला–केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी ही निवडणूक महत्त्वाची असून या निवडणुकीत गाववाला महत्त्वाचा की कामवाला महत्त्वाचा हे मतदाराने ठरवावे असे सांगून युवा नेते ऋषिकेश दादा कराड म्हणाले की, भाजपाच्या कार्यकाळात सर्वसामान्य जनतेला न्याय मिळतोय ग्रामीण भागाच्या विकासाला गती मिळते मात्र काँग्रेसवाल्याचा आणि त्यांच्या बगलबच्याची अडचण होत असल्याने विकास खुंटल्याचा आरोप केला जात असल्याचे बोलून दाखवले. विधानसभा निवडणुकी त उमेश आप्पांना जेवढे आशीर्वाद दिले त्याहून अधिक प्रमाणात या निवडणुकीची भाजपाच्या उमेदवारांना मतदान रुपी आशीर्वाद देऊन बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

प्रारंभी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुरेंद्र गोडभरले यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून आ रमेशअप्पा कराड यांच्या आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामाची माहिती देऊन आयुष्यात भविष्यात योजनांची माहिती दिली. शेवटी महेंद्र गोडभरले यांनी आभार व्यक्त केले या सभेस सुरेश बूड्डे, परमेश्वर दंडे, नामदेव बोंबडे, सुनिल बुड्डे, ओम चव्हाण, महेश सूडे, राम बड़े, अजय शेळके, मारूफ अत्तार, नारायण राठोड, बालाजी फड, श्रीकृष्ण मोटेगावकर, रमाकांत फूलारी, प्रल्हाद फूलरी, राज्कुमार मानमोडे, संगमेश्वर तत्तापूरे, खलील ताशेवाले, मुस्ताफा ताशेवाले, किशोर कुलकर्णी, नानासाहेब माने, निवत्ती चिते, पांडूरंग कलूरे, बालाजी मानमोडे, राजकुमार आडतराव, चद्रकांत माने, आशोक गंगथड़े, निताताई शिंदे यांच्यासह खरोळा गावातील आणि परिसरातील विविध गावचे भाजपाचे कार्यकर्ते मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काँग्रेस आघाडीच्या आक्रमक प्रचार यंत्रणेसमोर महायुती निष्प्रभ लातूर जिल्हा परिषद व पंचायत समितीवर काँग्रेस आघाडीचा झेंडा फडकणार

- . माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या प्रचार सभांचा झंझावात
- . पदाधिकाऱ्यांच्या सहभागातून शिस्तबद्ध त्रिस्तरीय प्रचार यंत्रणा
- . महायुतीच्या आमदारांना मतदारसंघात खीळवून ठेवले
- . माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचे काँग्रेस यंत्रणेला बळ
- . महायुती कारभाराचे वाभाडे काढण्यात काँग्रेस आघाडीला यश



लातूर प्रतिनीधी : जिल्ह्यातील सर्व समाजघटकांना प्रतिनिधित्व देत, उच्चशिक्षित आणि स्वच्छ प्रतिमेच्या उमेदवारांची निवड करुन, पदाधिकाऱ्यांना जबाबदारीचे वाटप आणि माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी जिल्हाभरात निर्माण केलेला प्रचाराचा झंझावात, यामुळे जिल्हा परिषद तसेच पंचायत समितीच्या निवडणुकीत काँग्रेस आघाडीने शेवटच्या टप्प्या पर्यंत आपली आघाडी कायम राखली आहे. यामुळे महानगरपालिकेप्रमाणेच लातूर जिल्हा परिषद आणि जिलहयातील बहुतांश पंचायत समित्यांवर काँग्रेस आघाडीचा झेंडा फडकेल, असे चित्र निर्माण झाले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या लातूर महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस वंचीत बहुजन आघाडीने घवघवीत यश संपादन केल्यामुळे काँग्रेस आघाडी कार्यकर्त्यांचा उत्साह आणि आत्मविश्वास उंचावलेला होता. नेमक्या याच वातावरणात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची घोषणा झाली. मनपातील विजयामुळे मनोबल उंचावलेल्या काँग्रेस आघााडी नेत्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी विश्रांती न घेता या निवडणुकीची तयारी सुरू केली. यात उमेदवार निवड तसेच आघाडी करण्याचे अधिकार स्थानिक (तालुका) पातळीवर देण्याची नवी योजना काँग्रेस पक्षाने आखली. अहमदपूरसह शक्य तिथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या मित्रपक्षांसोबत काँग्रेसने आघाडी करुन स्वच्छ प्रतिमा असलेल्या उमेदवारांना संधी दिली. स्थानिक पातळीवर उमेदवार निवडल्यामुळे बंडखोरी तर झाली नाहीच, उलट संघटना अधिक जिद्दीने प्रचारात उतरली. याच दरम्यान काँग्रेस पक्षाने स्वाभीमानी शेतकरी संघटना, शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रीय समाज पक्ष, ओबीसी बहूजन पार्टी या पक्षांचा पाठींबा मिळवला. उमेदवार निश्चित होताच आमदार अमित देशमुख यांनी अतिशय सुनियोजित पद्धतीने प्रचाराचे नियोजन करुन प्रचार सभांचा धडाका सुरू केला.

शिस्तबद्ध त्रिस्तरीय प्रचार यंत्रणा–या निवडणुकीत काँग्रेस आघाडीने प्रभावी त्रिस्तरीय प्रचार यंत्रणा राबवल्याचे दिसून येत आहे. ही यंत्रणा गाव, विधानसभा मतदारसंघ आणि जिल्हास्तर अशी त्रीस्तरीय यंत्रण आखली. या त्रीस्तरीय यंत्रणेत समन्वय ठेवण्याचे आणि प्रचार यंत्रणा गतीमान ठेवण्याचे काम निरीक्षका मार्फत होत असल्याचे दिसून येते.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात माजी आमदार धीरज देशमुख यांनी प्रचाराची जोरदार आघाडी सांभाळली आहे. औसा येथे श्रीशैल्य उटगे, निलंगा विधानसभा मतदारसंघात अशोकराव पाटील निलंगेकर व जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी किल्ला लढवला. उदगीर विधानसभा मतदार संघात कल्याण पाटील, शिवाजीराव हुडे, लक्ष्मीबाई भोसले आणि मारुती पांडे यांनी सामुहीकपणे प्रचार यंत्रणा राबवली. त्याच पध्दतीने आघाडीतील सहयोगी पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील आणि काँग्रेसच्या तालुकाध्यक्षांनी अहमदपूर, चाकूर तालुक्यात प्रचार यंत्रणेला गती दिली.

महायुतीच्या आमदारांना मतदारसंघात खीळवून ठेवले

लातूर महानगरपालीकेत काँग्रेस वंचीत बहूजन आघाडीचा झेंडा फडकल्यानंतर माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी जिल्हा परीषद व पंचायत समिती निवडणुकीत आक्रमकपणे प्रचार करीत लातूर जिल्हा पिंजून काढण्यास सुरुवात केली असतांना जिल्हयातील महायुतीच्या पाचही आमदारांना आपआपल्या मतदारसंघात अडकून पडावे लागले. लातूर महापालीका निवडणुकीत भाजपचे मंत्री संभाजी पाटील व आमदार अभिमान्यु पवार व आमदार रमेश कराड त्याच बरोबर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री संजय बनसोडे यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. लातूर महानगरपालीका निवडणुकीतील पराभवाच्या दणक्याने विचलीत झालेल्या महायुतीच्या या नेत्यांनी आपआपल्या विधानसभा मतदारसंघात तळ ठोकल्याचे दिसून आले. माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांच्या सोबतच माजी आमदार धिरज देशमुख, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अभय सांळुके, प्रदेश काँग्रेस सचिव श्रीशैल उटगे यांनीही जिल्हाभरात सभा घेतल्या परंतु महायुतीचे आमदार आपल्या मतदारसंघातून बाहेर पडू शकले नाहीत. माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांचे काँग्रेस यंत्रणेला बळ

लातूर जिल्हा परीषद पंचायत समिती निवडणुकीत मार्गदर्शकाच्या भुमिकेत राहीलेले माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी शेवटच्या टप्प्यात प्रत्यक्ष प्रचार प्रक्रीयेत सहभागी होवून महत्वाच्या ठीकाणी सभा घेतल्या. या सभामधून आवश्यक तो संदेश देवून काँग्रेस आघाडीच्या प्रचाराला बळ दिले.

स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेटटी, प्रदेश काँग्रेस ओबीसी सेलचे अध्यक्ष प्रा.यशपाल भिंगे, प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार यांनीही महत्वाच्या ठीकाणी सभा घेऊन काँगेस आघाडीच्या प्रचारास गती दिली. प्रदेश काँग्रेसचे सरचीटणीस भाऊसोहब आजबे, जिंतेद्र देहाडे यांनी प्रचार यंत्रणेत समन्वय राखण्याचे काम केले.

चौकट : महायुती कारभाराचे वाभाडे काढण्यात काँग्रेस आघाडीला यश

लातूर जिल्हा परीषद पंचायत समितीच्या या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या सर्वच नेत्यांनी महायुतीच्या कारभाराचे वाभाडे काढले. सर्वच ठीकाणी वाढलेला भृष्टाचार टक्केवारी, कमिशनखोरी चवहाटयावर आणली, लाडकी बहीन योजना महायुतीची नसून ती शासनाची असल्याचे पटवून दिले. मागच्या ९ ते १० वर्षात महायुतीने एकही भरीव योजना राबवली नसल्याचे निर्दशनास आणून दिले. निकृष्ट विकासकामे, कर्जफमाफीचा विसर आणि शेतीमालाचे भाव पाडण्यास, महागाई व बेरोजगारी वाढण्यास महायुतीच कारणीभुत असल्याचे समजावून सांगीतले. त्याचा ग्रामिण मतदारांवर परीणाम झाल्याचे दिसून येत आहे.

# राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी जिंकली प्रेक्षकांची मने ;उपस्थितीतांकडून कौतुकाचा वर्षाव

केज/प्रतिनिधी-राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळा ही



शहरातील नामांकित शाळा आहे.ही शाळा वर्षानुवर्ष संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य करीत आहे असे प्रतिपादन केजचे गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे यांनी केले.राजर्षी शाहू विद्या मंदिर केज शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात उदघाटक म्हणून उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते.

स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित राजर्षी शाहू विद्या मंदिर केज शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.विद्यार्थ्यांनी रंगमंचावर आपले कलागुण सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्घाटन दिप प्रज्वलन व राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केले.यावेळी कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ड.

राजेसाहेब देशमुख,उदघाटक म्हणून गटशिक्षणाधिकारी सुनिल केंद्रे प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय चाटे,सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले,

नगरसेवक बाळासाहेब गाढवे तर प्रमुख उपस्थितीमध्ये संस्था सचिव गदळे जी.बी,सहसचिव अशोकराव डांगे,कोषाध्यक्ष सय्यद नवाबसाहेब,शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.इतर उपस्थितीमध्ये ड.एस.बी.मस्के,शिक्षक पतसंस्थेचे संचालक अंबादास काळे,शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक डापकर एस. ए. व चौधरी बी.डी.यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रप्रेम,राष्ट्रीय एकात्मता,पाण्याचे महत्व,अंधश्रद्धा निर्मूलन याबाबतचे गीत व अभिनय सादर करत सामाजिक संदेश दिला.सांस्कृतिक गीतातुन देशात विविध जाती-

धर्माचे-पंथाचे लोक राहत असले तरीही राष्ट्रहितासाठी सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे असा संदेश दिला.महाराष्ट्राची संस्कृती व परंपरा सांगणारे लोकगीत,लावणी,भक्ती गीत यांनी कार्यक्रम आणखीनच बहारदार केला.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी क्रमिक अभ्यासाबरोबरच विविध स्पर्धा,उपक्रम,सांस्कृतिक कार्यक्रम या गोष्टी महत्त्वपूर्ण ठरतात.भविष्यातील कलाकाराचा पाया इथेच घातला जातो यासाठी शाळेकडून अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील ज्येष्ठ शिक्षक यादव व्ही.बी.यांनी केले तर आभार गदळे जी. बी.यांनी मानले.सर्व देशमुख ए.डी,क्षीरसागर आर.एस,डिरंगे जी. बी,मस्के जे.आर.श्रीमती गायकवाड ध्वजा,श्रीमती जाधव अनिता यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले.उत्कृष्ट नियोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षक वृंद यांचे अभिनंदन केले.स्नेहसंमेलनासाठी पालकांचा शेवटपर्यंत उदंड प्रतिसाद मिळाला.

# चिंचोली माळी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील चिंचोली



माळी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न झाले आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातील पालकांचा कल हा इंग्लिश मीडियमच्या शाळेकडे आहे.त्यामुळे जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या जिल्हा परिषदेच्या शाळा या विद्यार्थ्या अभावी बंद पडलेल्या आहेत.परंतु चिंचोली माळी हे गाव ग्रामीण भागातील आहे. या ठिकाणी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आहेत व विद्यार्थ्यांना ज्ञानदानास सोबतच कला क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांची उलखनीय कामगिरी पाहून त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून शैक्षणिक वर्षे २०२५-२६ चे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले आहे. या शाळेच्या शिक्षकांनी स्तुत्य उपक्रम घेतल्याबद्दल सर्व स्तरातून शाळेचे व शिक्षक वृंद यांचे कौतुक होत आहे. आपल्या गावची जिल्हा परिषद शाळा कायम चालू राहावी व गावाचे व शाळेचे नाव सर्व स्तरावर नावलौकिक व्हावे, या शाळेत चांगले शिक्षण घेऊन विद्यार्थी डॉक्टर, इंजिनीयर, कलेक्टर असे मोठ मोठे अधिकारी बनवून गावचे नाव रोशन करावे या संकल्पनेतून गावातील पालकांनी आपल्या मुलांना इंग्लिश स्कूलला न घालता जिल्हा परिषद शाळेत मुलांना शिक्षण घेण्यासाठी ठेवलेले आहे. पालकांचा विश्वास सार्थ ठेरविण्यासाठी या शाळेचे शिक्षक हे विद्यार्थी घडवण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत अशा पालक वर्गातून प्रतिक्रिया ऐकण्यास मिळत आहेत.

या कार्यक्रमाचे उद्धाटन शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक संजय गलांडे यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आले. या कार्यक्रमाला गावातील जेष्ठ नागरिक सुनील (आबा) गलांडे, कर्मवीर शिक्षण संस्थेचे माजी मुख्याध्यापक डी. के.गायकवाड, वैजनाथ राऊत, पत्रकार बाळासाहेब गलांडे, अभिजीत राऊत, राम(मेजर) राऊत,अजित शेख, सुरज गायकवाड, संजय नखाते, गुलाबभाई पठाण, राजेभाऊ सुतार यांच्यासह पालक, गावातील नागरिक व विद्यार्थी आणि शिक्षक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केंद्रीय मुख्याध्यापक संजय गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल राऊत सर, श्रीराम घुले सर, बाळासाहेब नाईकवाडे सर, उर्दू शाळेचे मुख्याध्यापक मुजम्मील शेख सर, श्रीमती पिसे मॅडम, श्रीमती वानखेडे मॅडम, श्रीमती शिंदे मॅडम, श्रीमती समरीन मॅडम, श्रीमती बाराते मॅडम यांनी अथक परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल राऊत व श्रीमती वानखेडे मॅडम यांनी केले तर उपस्थितांचे आभार , श्रीराम घुले यांनी मानले.

# वन्यजीव प्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीचे अनुदान द्यावे- नानाजी खाकरे

लातूर : लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे वन्यजीव प्राण्यांच्या उपद्रवांमुळे मोठे आर्थिक नुकसान होत असून त्याचा फटका सर्वसामान्य शेतकऱ्यांना बसत आहे. याची भरपाई म्हणून सरकारने आर्थिक स्वरूपात मदत करावी अशी मागणी भारतीय किसान संघाचे अखिल भारती जैवीक शेती प्रमुख नानाजी आखरे यांनी आयोजीत पत्रकार परिषदेत केली.




यावेळी महाराष्ट्र प्रांत संघटन मंत्री चंदन पाटील, जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, जिल्हा मंत्री सतीश देशपांडे तावशीकर आदिंची उपस्थिती होती.

भारतीय किसान संघाच्या वतीने लातूर येथील संघ कार्यालयातील जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बैठक आयोजीत करण्यात आली होती. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना शेतीमालाला उत्पादन आधारीत खर्चावर दीडपट अधिक भाव मिळाला पाहिजे अशी किसान संघाची मागणी आहे. भारतीय किसान संघही देशभर शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर संघर्ष करणारी पक्षविरहीत संघटना आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी संस्थापक अध्यक्ष दत्तोपंत ठेंगडी ४ मार्च १९७९ रोजी या संघटनेची स्थापना केली. महाराष्ट्रातील ७० हजार गावांतून ग्रामसमिती नेमली असून त्या समितीमार्फत शेतकऱ्यांना जैवीक शेतीसाठीचे मोफत प्रशिक्षण दिले जात आहे. संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठविला जातो. शेतकरी एकजुटीसाठी देशभर प्रयत्नशील असलेल्या या संघटनेने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सरकारने एफआरपीनुसार भाव जाहीर करण्या संदर्भात प्रस्ताव दिला होता. त्यानुसार सरकारने एफआरपी दिली असली तरी प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांच्या पदरात काहीही पडत नाही. शासनाने हमीभाव केंद्रे जरी उभारली असली तरी ही खरेदी केंद्रे उशिरा सुरू होत असल्याने व शेतकऱ्यांना मजबुरीने बाजारात माल विकावा लागतो त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. या नुकसानीची भरपाई म्हणून भावांतर योजनेअंतर्गत मदत द्यावी जेणेकरून सकारला खरेदी केंद्रासाठी लागणारे मनुष्यबळ व इतर खर्च करावा लागणार नाही. यासाठी आम्ही महाराष्ट्र सरकारकडे भावांतर फरकाचा प्रस्ताव दिला आहे तो अंमलात आणावा, असेही खाकरे यांनी यावेळी नमुद केले. विविध प्रश्नांवर आयोजीत बैठकीत लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रमुख तीन मागण्या समोर आलेल्या आहेत. त्याच्या पूर्ततेसाठी आम्ही जिल्हा प्रशासनाकडे जिल्हाध्यक्षांमार्फत निवेदन देऊन मागणी करणार आहोत. ही मागणी वेळेत पूर्ण न झाल्यास येत्या २४ मार्च रोजी आंदोलन करण्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला.

लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वन्यजीव प्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. या नुकसानीपासून बचाव करण्यासाठी कुंपन योजना सुरू केली असली तरी त्याची तरतूद अत्यल्प आहे. या वन्यजीव प्राण्यांचा सरकारनेच बंदोबस्त करावा अथवा शेतीला कुंपन करण्यासाठी योग्य ती मदत शेतकऱ्यांना करावी. तसेच येणाऱ्या काळात शेतकऱ्यांचा हरभरा हा बाजारात येणार असून त्यासाठी खरेदी केंद्रे तात्काळ सुरू करावीत, जेणेकरून शेतकऱ्यांच्या हातात योग्य मोबदला मिळेल. शासकीय यंत्रणा व त्यात बसलेले अधिकारी हे जाणीवपूर्वक उशिरा खरेदी केंद्र सुरू करतात त्यामुळे नाविलाजास्तव शेतकऱ्यांना कमी भावात माल विकावा लागतो. तसेच शेतकऱ्यांच्या पाणंद रस्त्यांचा विषयही लवकरात सरकारने सोडवावा. आदी वरील तीन मागण्या या लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या महत्वपूर्ण असून याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा भारतीय संघाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी प्रांताध्यक्ष नवनाथ मद्दे, जिल्हामंत्री सतीश देशपांडे तावशीकर तर कोषाध्यक्ष शेखर मराठे, प्रसिद्धीप्रमुख संजय देशपांडे आदिंची उपस्थिती होती.

# कॉंग्रेस-वंचित युतीवरुन संतोष सूर्यवंशींचा आरोप; सत्तेत सहभाग नाकारत दिशाभूल केली

लातूर । प्रतिनिधी-कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांची स्थानिक स्तरावर झालेली युती ही कॉंग्रेसचे महाराष्ट्र सरचिटणीस आजबे, आमदार अमित देशमुख तसेच वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा महासचिव संतोष सूर्यवंशी आणि महानगर अध्यक्ष सचिन गायकवाड यांच्या चर्चे तून निश्चित झाली होती. त्यानंतर श्रद्धेय प्रकाशजी उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांचीही संमती घेण्यात आली होती, अशी माहिती संतोष सूर्यवंशी यांनी दिली.




या युतीमुळे सत्तेबाहेर असलेली कॉंग्रेस सत्तेत आली; मात्र सत्तेत आल्यानंतर वंचित बहुजन आघाडीला योग्य प्रतिनिधित्व देण्याबाबत कॉंग्रेसकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याचा आरोप सूर्यवंशी यांनी केला. सत्तेत सहभाग देताना गोलमोल उत्तरे दिली जात आहेत. आम्हाला कोणतेही पद न देता 'योग्य वेळी आमदार अमित देशमुख ठरवतील, त्यांना अधिकार देऊ' असे सांगत आम्हाला सत्तेबाहेर ठेवण्याचे काम कॉंग्रेस करत आहे, असे ते म्हणाले.

जिल्हा परिषद निवडणुकीत प्रत्यक्ष युती नसतानाही कॉंग्रेसकडून आमच्यासोबत युती असल्याचे बॅनर लावले जात असून, प्रकाश आंबेडकर साहेबांवर प्रेम करणाऱ्या मतदारांची दिशाभूल केली जात आहे, असा आरोपही त्यांनी केला.

सूर्यवंशी यांनी प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकात म्हटले आहे की कॉंग्रेस नेत्यांना खुली मागणी केली. आमदार अमित देशमुख आणि शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी स्पष्ट करावे की वंचित बहुजन आघाडीला सत्तेत नेमकी कोणती भागीदारी दिली आहे किंवा देणार आहेत. यापुढे दिशाभूल करणारी विधाने करू नयेत, असे आवाहन केल्यास त्याची माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

# लातूर येथील कॉंग्रेस वंचित बहुजन आघाडी यांच्यातील एकजूट अभेद्य!- किरण जाधव

लातूर( प्रतिनिधी): लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत कॉंग्रेस पक्ष आणि.वंचित बहुजन आघाडी यांच्या दरम्यान झालेली आघाडी अभेद्य असून या पुढेही ती अभेद्य राहणार आहे आहे असे नमूद करून महानगरपालिकेतील कामकाज आणि जबाबदाऱ्याच्या वाटपासंदर्भात दोन्ही पक्ष मिळून समन्वयाने निर्णय घेतील असा विश्वास लातूर शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव यांनी व्यक्त केला आहे.लातूर शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव यांनी या संदर्भाने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कॉंग्रेसचे अध्यक्ष मा. हर्षवर्धनजी सपकाळ, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय नेते आदरणीय बाळासाहेबजी आंबेडकर आणि माजी मंत्री आमदार मा. अमित विलासराव देशमुख यांच्या पुढाकारातून ही आघाडी स्थापन झालेली आहे. लातूर महानगरपालिका निवडणुकीत या आघाडीला भरघोस असे यशही मिळाले आहे. त्यातून संपूर्ण महाराष्ट्रात एक चांगला संदेश गेला आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या या एकूण प्रक्रियेत आणि नंतरही कॉंग्रेस पक्षाने नेहमीच वंचित बहुजन आघाडीसोबतच्या आघाडीचा सन्मान आणि आदर राखला आहे. आणि भविष्याची आज हा आदर कायम पणाने राखला जाईल याची मला खात्रीआहे, यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख हे कॉंग्रेस पक्षाचे नगरसेवक आणि वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक यामध्ये कोणताही फरक करीत नाहीत. त्यामुळे आगामी काळातही वंचित बहुजन आघाडीच्या, तसेच कॉंग्रेस पक्षाच्या स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संयमी भूमिका घ्यावी, कॉंग्रेस - वंचित बहुजन आघाडीच्या मजबुतीला धक्का बसेल अशी विधाने करू नयेत असे आवाहनही ड किरण जाधव यांनी या प्रसिद्धीपत्रकात केले आहे.

आगामी काळात हे दोन्ही पक्ष एकत्रितपणे काम करून लातूर शहराच्या विकास प्रक्रियेला गती देतील, कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची लातूर मधील सकारात्मक विचारातून निर्माण झालेली आघाडी महाराष्ट्राच्या राजकारणासाठी दिशादर्शक ठरेल असा विश्वासही ड किरण जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या शेवटी व्यक्त केला आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.